तरुण भारत शनिवार, २७ ऑगस्ट २०२२

# एकजुटीमुळेच 'रवळनाथ'ची प्रगती

## संचालक डॉ. निळपणकर : नेसरीत ज्येष्ठ सभासद, विद्यार्थ्यांचा गौरव

वार्ताहर
नेसरी

संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांची दूरदृष्टी, शिस्त आणि संचालक, सल्लागार व कर्मचारी यांचे एकजुटीचे प्रयत्न आणि पारदर्शक कामकाज, सभासद, ठेवीदार कर्जदार व ग्राहकांचा विश्वास यामुळेच अल्पावधीत 'रवळनाथ'ची प्रगती झाल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ संचालक डॉ. आर. एस. निळपणकर यांनी केले.

श्री रवळनाथ को – ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे आयोजित वयाची पंच्याहत्तरी पूर्ण झालेले सभासद, सेवानिवृत्त सभासद व सभासदांच्या यशवंत पाल्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. नेसरी शाखेत कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. निळपणकर म्हणाले, सेवानिवृत्तांनी आपल्या अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा. विद्यार्थ्यांनी 'हार्ड वर्क'ऐवजी 'स्मार्ट वर्क' करावे. त्यातूनच उज्वल यश मिळून करिअरही चांगले होईल. यावेळी सभासदांचे पाल्य दिसी पाटील, सलोनी गुडूळकर, प्रणाली मनगुतकर, ओंकार माने, सेवानिवृत्त सभासद राजेखान कुरणे, राजाराम गावडे, वयाची पंच्याहत्तरी पूर्ण झालेले सभासद सिध्दाप्पा राजगोळकर, विजयमाला सुर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला.



नेसरी : राजाराम गावडे यांचा सत्कार करताना शाखा चेअरमन आर. बी. पाटील यांच्यासह डॉ. आर. एस. निळपणकर, उमा तोरगल्ली यांच्यासह अन्य.

याप्रसंगी संचालक महेश मजती, रेखा पोतदार, उमा तोरगल्ली, सीईओ डी. के. मायदेव, राजेखान कुरणे, सुरेश गुडूळकर, सिध्दाप्पा राजगोळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

नेसरी शाखा सल्लागार डॉ. डी. एम. पाटील यांनी स्वागत केले. शाखा चेअरमन आर. बी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. शाखा सल्लागार मुख्याध्यापिका शमा कुरणे यांनी सूत्रसंचालन केले. शाखा सल्लागार डॉ. व्ही. के. दळवी यांनी आभार मानले. कार्यक्रमास जोतीबा निचळ, कृष्णा मनगुतकर, संजय माने आदींसह शाखाधिकारी किरण कोडोली यांच्यासह सभासद, कर्मचारी उपस्थित होते.